फोन. न.(2462) 229242,, 229243
फॅक्स नं. (2462) 229574

Phone : (02462) 229242, 229243
Fax (02462) 229574

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
"ज्ञानतीर्थ" विष्णुपूरी.
**नांदेड- ४३१ ६०६.**

**SWAMIRAMANANDTEERTHM ARATHWADAUNIVERSITY,**
"Dnyanteerth" Vishnupuri
**NANDED – 431 606 (MH.)**

जावक क्रं. शैक्षणिक / मान्यता / परिपत्रक / 02 / 2014–2015 /

Date : February 5, 2015

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालयाचे संस्थाचालक व प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील रिक्त असणारी प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल आणि संचालक शारीरिक शिक्षण व क्रीडा या पदावर नियुक्ती करण्याची प्रक्रिया संस्थेने / महाविद्यालयाने करावी यासाठी प्रस्तुत विद्यापीठाने सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. कांही महाविद्यालयात प्राचार्यांचे पद भरलेले नाही व एकही अर्हताधारक अध्यापकाची नेमणूक केलेली नाही अशा महाविद्यालयांच्या बाबतीत शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त होत आहे. तसेच मा.शिक्षण संचालक, पुणे व मा.शिक्षण सहसंचालक, नांदेड यांच्या पत्रानुसार मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ नागपूर, रिट याचिका क्र.२४४८/२०१३, ३४३५/२०१३, ६४५९/२०१३ सुनिल मिश्रा, आकार बहु. ग्रामीण विकास संस्था व इतर अमर सेवा मंडळ व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन संदर्भात एकही अर्हताधारक अध्यापक नेमणूक न केलेल्या महाविद्यालयाची यादी मागविलेली आहे. अशा एकही अर्हताधारक अध्यापक नेमणूक न केलेल्या महाविद्यालयांचे असंलग्नीकरण करण्याबाबत मा.कुलगुरूंनी आदेश दिले आहेत.

ज्या संस्था/महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील रिक्त प्राचार्यांची व एकही अध्यापकांची विहित पध्दतीने नेमणूक केलेली नाही अशा संस्थेने/महाविद्यालयाने त्वरीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास लेखी स्वरूपात सादर करावा. अन्यथा याबाबत भविष्यात शासनाकडून कार्यवाहीचे आदेश निर्गमित झाल्यास किंवा मा.न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची/महाविद्यालयाची असेल याची सर्व संबंधितांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

'ज्ञानतीर्थ' )(
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ )(
जा.क्र.शैक्षणिक/०२/२०१४–१५/2892 )(
दिनांक : ०४/०२/२०१५ )(
10

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

***

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:

१) मा.अध्यक्ष/सचिव, सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या संस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१
४) मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड – ४३१ ६०६
५) सहा.कुलसचिव, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) श्री अजय दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.